Peer reviewed Journal Impact Factor 7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

***A Multidisciplinary International Level Referred Journal***

**July 2021 Volume-11 Issue-27**



## *Impact of Environment on Agriculture, Health, Water Resources, Social Life & Industrial Development*




**Chief Editor**
**Dr. R. V. Bhole**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot
No-23, Mundada Nagar, Jalgaon

| Executive Editors | Executive Editors | Executive Editors |
|---|---|---|
| **Dr. M. N. Kolpuke** | **Dr. S. S. Patil** | **Dr. E. U. Masumdar** |
| Principal, | Principal, | Principal, |
| Maharashtra Mahavidyalaya, Nilanga | Maharashtra College of Pharmacy, Nilanga | Azad Mahavidyalaya, Ausa |

Co- Editors

Dr. B. N. Paul, Dr. C.J. Kadam, Prof. T. A. Jahagirdar, Dr. Naresh Pinamkar
Dr. C. V. Panchal, Dr. Nisar Syed, Mr. Santosh P Mane







**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102



## CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1. | "पर्यावरण संवर्धन काळाची गरज"<br>प्रा. डॉ.अंभुरे एस. डी. | 1-3 |
| 2 | वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शारीरिक शिक्षणविषयक अभिवृत्तीचा चिकित्सक अभ्यास<br>श्री मावळे शरद अरुण | 4-7 |
| 3 | छत्रपती शिवाजी महाराजांची जल व्यवस्थापन पद्धती – एक अभ्यास<br>Dr. Ladaf S.K | 8-10 |
| 4 | दुष्काळ आणि शेतकरी आत्महत्या : विशेष संदर्भ शेतकरी दीर्घकाव्य<br>प्रा डॉ. बालाजी विठ्ठलराव हिंगोले | 11-13 |
| 5 | रवींद्र शोभणे यांच्या साहित्यात पडलेले दुष्काळाचे प्रतिबिंब आणि आजचे वास्तव<br>प्रा. डॉ. सुनिल भावराव देसले | 14-17 |
| 6 | "जलसंबंधित ग्रामीण अर्थव्यवस्था आणि विकास"<br>प्रा. डॉ. खिस्ते ओंकार बाळकृष्ण | 18-20 |
| 7 | "भारतीय शेती विकासाचा अभ्यास"<br>डॉ. राजाराम महादेव बोरात | 21-25 |
| 8 | चंदगड तालुक्यातील जलव्यवस्थापनाचा इतिहास<br>Dr.Madhukar Vithoba Jadhav | 26-29 |
| 9 | लोकसंख्येचा विस्फोट पर्यावरणाच्या -हासाला कारणीभूत<br>डॉ. कविता मते | 30-32 |
| 10 | पर्यावरण संवर्धन : काळाची गरज<br>प्रा. डा. हेमचंद दुधगवळी | 33-34 |
| 11 | कोविड — 19 का भारतीय अर्थव्यवस्था पर प्रभाव<br>प्रा. मोरेश्वर भिकाजी शेन्डे | 35-38 |
| 12 | ग्रामीण विभागातील कृषी विकासाचा चिकित्सक अभ्यास<br>डॉ. राजेंद्र तुळशीदास आहिरे | 39-42 |
| 13 | दुष्काळजन्य परिस्थिती चे साहित्यातील चित्रण<br>विकास नामदेव लोडे | 43-46 |
| 14 | जलव्यवस्थापन काळाची गरज<br>डॉ. डी. एम. कदम | 47-50 |
| 15 | चळवळी आणि हिंदू तत्वज्ञान यांची सांस्कृतिक व राजकीय चर्चा करणारा मौलिक ग्रंथ'<br>प्रा. डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले | 51-53 |
| 16 | पर्यावरण आणि समाज<br>प्रा. डॉ. मंगला कडवे | 54-56 |
| 17 | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा - जिल्हा रायगड ही एक रायगड जिल्ह्यातील बचत गटांना प्रोत्साहित करणारी संस्था<br>प्रा. शत्रुघ्न नामदेव लोहकरे, प्रा. डॉ. मनीषा कर्णे | 57-59 |
| 18 | भारतातील कृषि आणि जलसिंचन सुविधांचा आढावा<br>पांचाळ विजय किशनराव | 60-62 |
| 19 | नागपूर शहर में अपशिष्ट जल प्रबंधन; धारणीय विकास की ओर एक पहल<br>स्वाती रमेश भोवते, डॉ.अविनाश व. तलमले | 63-67 |
| 20 | "जल प्रदूषण आणि मानवी आरोग्य"<br>प्रा.डॉ.अनिल निवृत्ती शिंदे | 68-72 |
| 21 | शेतकरी आत्महत्या व समाजकार्य कर्त्याची भुमिका<br>डॉ. मनोज श्रीकृष्णराव पवार | 73-76 |
| 22 | शेतक-यांच्या समस्या आणि शेती विकास एक विश्लेषणात्मक अध्ययन<br>प्रा.डॉ. प्रशांत रा. देशमुख | 77-81 |
| 23 | चंद्रपूर परिसरातील कोळसा खाणिचा स्थानिक पर्यावरणावर होणारा परिणाम<br>अमोल काशीनाथ बावने, मनिषा दूधराम ठवरे | 82-84 |
| 24 | पर्यावरण संवर्धनात आदिवासींचे योगदान<br>प्रा. डॉ.भास्कर गायकवाड | 85-88 |

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 20 July-2021, Volume-11, Issue-27
Impact of Environment on Agriculture, Health, Water Resources, Social Life & Industrial Development

# "जल प्रदूषण आणि मानवी आरोग्य"

**प्रा.डॉ.अनिल निवृत्ती शिंदे**
*भूगोल विभाग प्रमुख, डॉ.सी.डी.देशमुख कॉलेज रोहा. ता.रोहा,जि.रायगड.*
*Email- anilshinde.geo@gmail.com*

**गोषवारा:**

पृथ्वीच्या पृष्ठभागावर सुमारे 70% पाणी आहे. शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी ही सर्व मानवाची मूलभूत गरज आहे.डब्ल्यु.एच.ओ.(WHO) ने सांगितले आहे की 80% आजार पाण्यामुळे होतात. औद्योगिकीकरण, घरगुती कचऱ्याचा विसर्ग, किरणोत्सर्गी कचरा, लोकसंख्या वाढ,कीटकनाशकांचा जास्त वापर, खतांचा आणि पाण्याचा अतीवापर हे जल प्रदूषणाचे प्रमुख स्त्रोत आहेत.जलप्रदूषणाचा मानवी आरोग्यावर नकारात्मक परिणाम होत आहेत. वेगवेगळया रसायनांचा त्यांच्या पाण्यातील स्थानावर आणि प्रकारानुसार वेगवेगळा परिणाम होतो जीवाणूजन्य,विषाणूजन्य आणि परजीवी रोग जसेटायफॉइड, कॉलरा, .एन्सेफलायटीस, पोलिओमायलायटिस,हेपेटायटीस,त्वचारोगसंसर्ग,लैंगिक कार्यक्षमता आणि गॅस्ट्रो-इंटेस्टाइनल प्रदूषित पाण्याद्वारे पसरत आहेत. मानवी आरोग्यावर त्याचा विनाशकारी प्रभाव टाळण्यासाठी नियमितपणे पाण्याच्या गुणवत्तेचे परीक्षण करणे गरजेचे आहे. घरगुती व शेतीतील कचरा उपचार न करता विल्हेवाट लावू नये.

**कूट शब्द** : जल प्रदूषण, जल प्रदूषण स्त्रोत, हानिकारक रसायने, संक्रमण रोग.

**प्रस्तावना :**

मानवी कृत्यांमुळे पाण्याच्या नैसर्गिक गुणवत्तेमध्ये बदल होतात आणि ते पाणी जेव्हा सजीवांच्या पिण्यायोग्य राहत नाही तेव्हा जे प्रदूषण होते त्या प्रदूषणाला "जल प्रदूषण" म्हणतात.जल प्रदूषण ही सर्व जगाला भेडसावणारी पर्यावरणीय गंभीर समस्या आहे. जल प्रदूषणामुळे पाण्यात विशिष्ट गुणधर्मांचे पदार्थ अशा प्रमाणात मिसळले जातात की, त्यामुळे पाण्याच्या नैसर्गिक गुणवत्तेत बदल होऊन ते वापरण्यास अयोग्य ठरते. जल प्रदूषणामुळे सजीवांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतात किंवा पाण्याची चव बिघडते, ते घाणेरडे दिसते वा दुर्गंधीयुक्त होते. मानवी कृती आणि अन्य कारणांमुळे पाण्याच्या नैसर्गिक गुणवत्तेत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे बदल होतात आणि पाणी कोणत्याही कारणासाठी वापरण्यास अयोग्य ठरते. या पाण्याला प्रदूषित जल म्हणतात. पाण्याचे प्राकृतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्म बदलल्याने मानव व जलीय सजीवांवर अपायकारक परिणाम करणारी जल प्रदूषण ही प्रक्रिया आहे. नैसर्गिक पाण्यात एखादा बाह्य पदार्थ अथवा उष्णता यांची भर पडल्यास ते पाणी प्रदूषित होऊन त्याचा मानव, इतर प्राणी आणि जलीय जीव यांना अपाय होतो. जगातील बहुतेक देशांत जल प्रदूषण ही गंभीर समस्या बनली आहे. जेव्हा बाह्य दुषीतके पाण्यामध्ये प्रवेश करतात तेव्हा पाण्याचे प्रदूषण होते म्हणजेच पाण्याची गुणवत्ता बदलते आणि ते पर्यावरण व मानवी आरोग्यास हानिकारक ठरते. आपल्या जीवनात पिण्याच्या आणि इतर विकासासाठी पाणी हे एक महत्त्वपूर्ण नैसर्गिक संसाधन आहे. संपूर्ण जगात मानवी आरोग्यासाठी सुरक्षित पिण्याचे पाणी आवश्यक आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) अहवालानुसार 80% रोग पाण्यामुळे होतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) मानकांनुसार जागतिक पाण्याची मानके पूर्ण होत नाही. जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार 3.1% मृत्यू निर्जंतुकीकरण न झालेल्या आणि खराब दर्जाच्या पाण्यामुळे होते. औद्योगिक रासायनिक पदार्थ पाण्यात सोडणे, सांडपाणी मैलापाणी जलाशयात सोडल्याने, रासायनिक खते, किटकनाशके पाण्यात मिसळल्याने, पाण्यातील जीव मृत होऊन कुजल्याने, कचरा किंवा तत्सम पदार्थ पाण्यात टाकल्याने

जनावरे, कपडे, भांडी नदीच्या ठिकाणी धुतल्याने, मृत जनावरे नदीत टाकल्याने, रासायनिक रंगकाम केलेल्या आणि प्लास्टर ऑफ पॅरिस पासून बनविलेल्या मूर्त्यांच्या विसर्जन यासारख्या कारणांनी जल प्रदूषण होत आहेत.जलप्रदुषणामुळे पाण्यामध्ये जीवाणूंची उत्पत्ती होते असे जीवाणूयुक्त पाणी पिल्याने अनेक रोग उत्पन्न होतात. यामध्ये अतिसार, उलटी, काविळ, विविध ताप, कॉलरा, मलेरिया, खोकला, सर्दि यासारखे रोग उत्पन्न होतात.